**वाडा भाड्याने देणे आहे**

बस स्थानकापासून जवळ आणि पोस्ट ऑफिससमोरील मध्यवर्ती ठिकाणी असलेला करजगी ता. अक्कलकोट या गावातील 5 हजार स्वे. फूट बांधकाम असलेला जुना वाडा तळघरासाहित भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, वैद्यकीय व्यवसाय आणि शासकीय कार्यालयासाठी बहुउपयोगी.

अधिक माहितीसाठी संपर्कः
9975434591



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



**सेवेकरी भरती**

१) सुपरवायझर- १ | २) पुजारी- १
३) शेतगडी जोडी- २ | ४) सफाई सेवेकरी- १
५) वॉचमन- ३ | ६) स्वयंपाक बाई-१

याप्रमाणे सेवेकरी भरती चालू आहे
होतकरू गरजू यांनी संपर्क साधावा

पत्ता:- श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर रोड १२१ कान्होळी अक्कलकोट
संपर्क:- 8625050111



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १६८ वा | बुधवार, दि. ०५ फेब्रुवारी २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# हरामखोर राहुल सोलापूरकराने केलेल्या विधानामागे कोणाचा सडका मेंदू?

## रोहित पवार यांचा सवाल

## छत्रपती शिवरायांचा अवमान; अणाजीपंताच्या औलादी आजही जाणीवपूर्वक करतात

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आग्र्याहून सुटकेचा प्रसंग इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. दरम्यान आग्रा येथून महाराजांनी सुटका करून घेतल्याबद्दल राहुल सोलापूरकर याने केलेला दावा गेल्या काही दिवासांपूर्वी चांगलाच चर्चेत आला आहे. आग्यार्हून सुटका करून घेण्यासाठी मिठाईच्या पेटाऱ्यांचा वापर करण्यात आला नव्हता, तर छत्रपती शिवाजी महाराज हे औरंगजेबाच्या अनेक सरदारांना लाच देऊन आग्यार्हून सुटून महाराष्ट्रात परतले, असा दावा अभिनेते राहुल सोलापूरकर याने केला होता. दरम्यान त्याच्या या वक्तव्यामुळे नवा वाद उफाळून आला आहे. यावर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहीत पवार यांनी टीका केली आहे.

**काय म्हटलं आहे रोहीत पवार यांनी ?**

अडगळीत पडलेल्या एका अभिनेत्याने चर्चेत येण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अश्लाघ्य विधान केलं नाही ना? तसं नसेल तर या विधानामागील हेतू आणि सडका मेंदू कुणाचा आहे हे शोधणं गरजेचं आहे. काही वेडपट माणसं छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह महाराष्ट्रातील महान व्यक्तिमत्त्वांविषयी चुकीची विधानं कुणाच्या आशीवार्दाने करतात? महापुरुष हे केवळ महाराष्ट्रातील व्यक्तींसाठी नाही तर सर्वांसाठीच पूजनीय आहेत, त्यामुळं त्यांच्याविषयी वादग्रस्त विधानं करणं थांबवलं पाहिजे, अन्यथा अशा महाभागांना मराठी माणूस जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. असा इशारा रोहीत पवार यांनी दिला आहे.




**राहुल सोलापूरकर याचं वक्तव्य काय?**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिस्तीचं मोठेपण कळावं म्हणून हिरकणीची कथा रचली गेली आहे. गडाचे दरवाजे सूर्यास्ताला बंद व्हायचे वगैरे सांगत. हिरकणी घडलेलीच नाही. असं काहीही नाही. असा इतिहासच नाही. पण लिहिलं गेलं. महाराज आग्यार्हून सुटले ते मिठाईचे पेटारे वगैरे काही नव्हते. चक्क लाच देऊन आले आहेत महाराज, त्यासाठी किती हुंड्या सोडवल्या याचे पुरावे आहेत. औरंगजेबाच्या वजीराला आणि त्याच्या बायकोलाही लाच दिली गेली आहे. मौसिन खान किंवा मौईन खान नाव आहे त्याचे परवाने घेऊन सगळे बाहेर पडले आहेत. स्वामी परमानंद शेवटचे पाच हत्ती घेऊन गेले त्याच्या परवान्याची खूणही आहे अजूनही. गोष्टी रुपात करताना ते रंजक करुन सांगितलं गेलं आहे. त्यामुळे खरा इतिहास लोकांसमोर जात नाही. असं राहुल सोलापूरकर याने म्हटलं आहे. राहुल सोलापूरकर याने मुक्काम पोस्ट मनोरंजन या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत त्याने हे वक्तव्य केलं होतं. ज्यावरुन चांगलाच वाद निर्माण झाला आहे.

# राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिमेला जोडोमार आंदोलन

## जिल्हाधिकारी यांच्याकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिवाजी महाराज यांच्या बाबत मराठी अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सामर्थ्याची आणि कर्तुत्वाचे अवमूल्य केल्यामुळे राहुल सोलापूरकर यांनी तशी पुरावे द्यावेत अन्यथा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

बुद्धिचातुर्य, धैर्य, गनिमा कावा अशा विविध गुणांनी त्यांनी लढवलेले डावपेच यांनी इतिहासात महत्त्वाचं स्थान मिळवलं आहे. यापैकीच एक घटना म्हणजे शिवाजी महाराजांची आग्यार्हून सुटका होती.



छत्रपती शिवाजी महाराज हे अखंड महाराष्ट्र सह देशभरात आपल्या कर्तृत्व आणि सामर्थ्याची गाथा पोहोचणारे असल्यामुळे अनेकांचे प्रेरणास्थानी आहेत.

जगप्रसिद्ध आग्र्याच्या सुटकेच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराज लाच देऊन आग्यार्हून सुटून आले होते त्यासाठी त्यांनी कितीतरी हुंडी वाटले त्यांनी औरंगजेबाच्या वजीरासह त्याच्या बायकोला लाच दिली मोहसीन खान नावाच्या सरदाराकडून सही शिक्का असणारे अधिकृत पत्र त्यांनी घेतल्याचं त्याचबरोबर हिरकणी ही एक कथा असून हिरकणीची घटना घडलेलीच नाही महाराजांच्या शिस्तीचा मोठेपणा म्हणून ही गोष्ट रचलेली आहे असे एका मुलाखतीत वक्तव्य करून छत्रपती शिवाजी महाराज यांचा दैदिप्यमान पराक्रमी इतिहास चुकीच्या पद्धतीने सांगून त्यांची कर्तबदारी कर्तुत्व व पराक्रम कमी करण्याचा प्रयत्न या राहुल सोलापूरकर ने केलेला आहे त्यामुळे आमच्यासह तमाम शिवशंभु प्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत.

यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे कार्याध्यक्ष अरविंद शेळके संपर्कप्रमुख छत्रगुण माने उपाध्यक्ष सीताराम बाबर फिरोज सय्यद दिलीप निंबाळकर लखन गायकवाड आकाश नाईकवाडी वैभव धुमाळ ज्ञानेश्वर कदम आदि उपस्थित होते.

# बिलासाठी मृतदेह अडविणाऱ्या रुग्णालयांना नोटिसा

## राज्यातील १९ हजार ३८८ नर्सिंग होमची तपासणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बॉम्बे नर्सिंग ॲक्टमधील तरतुदीनुसार कोणत्याही खासगी रुग्णालयास मृत रुग्णाचा मृतदेह बिल दिले नाही म्हणून अडवून ठेवता येत नाही. तरीदेखील, कायद्यातील तरतुदी पायदळी तुडवून बिलासाठी मृतदेह अडविणाऱ्या रुग्णालयांना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने नोटिसा बजावल्या आहेत.

राज्यातील १९ हजार ३८८ नर्सिंग होमची पडताळणी झाल्यावर त्यातील दोन हजार ९३६ रुग्णालयांनी नियमांचे पालन केले नसल्याची बाब समोर आली आहे. त्यांना आता एका महिन्यात नोटिशीवर खुलासा द्यावा लागणार आहे. राज्याचे



सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यातील खासगी रुग्णालये कायद्याचे पालन करतात की नाहीत, यासंदभार्तील तपासणी करून एक महिन्यात अहवाल मागविला होता.

**नर्सिंग होमची स्थिती**

२४,४०० – एकूण अंदाजे रुग्णालये
१९,३८८ – आतापर्यंत तपासणी
२,९३६ – त्रुटी आढळलेली रुग्णालये
१ महिना – त्रुटी पूर्ततेसाठी कालावधी

त्यानुसार जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्याधिकारी व महापालिकेतील वैद्यकीय आरोग्याधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांची तपासणी केली. ५ जानेवारीपासून ही तपासणी सुरु असून त्याचा अहवाल सोमवारी आरोग्य मंत्र्यांकडे सोपविण्यात आला आहे.

# सोलापूरात शनिवारी गडीनाड कन्नड संमेलनाचे आयोजन

## दिवसभर भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** कर्नाटक सीमा क्षेत्र विकास प्राधिकरण बेंगलोर आणि न्यासा मानव विकास संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवस्मारक येथे गडीनाड कन्नड सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रा. रविकुमार सोलापुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.




सकाळी ८.३० वाजता मल्लिकार्जुन मंदिर ते शिवस्मारक पर्यत शोभायात्रा काढण्यात येणार आहे. संमेलनाचे उद्घाटन प. पू. श्रीकाशी जगद्गुरु डॉ. मलिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी संमेलनाध्यक्ष डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, खा. प्रणिती शिंदे, आ. विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आ. सचिन कल्याणशेट्टी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळमुंडे, बेंगलोरचे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजशेखर मठपती, उद्योजक विनोद दुधनी, पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा आदी मान्यवराची प्रमुख उपस्थिती असणार आहे. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान कर्नाटक गडी प्रदेश अभिवृद्धी प्राधिकरण, बेंगलोर) अध्यक्ष सोमण्णा बेविनमरद आणि प्रकाश मत्तीहळ्ळी (कार्यदर्शी) हे भूषविणार आहेत.

या संमेलनामध्ये स्वरयोगिनी साधना योगलक्ष्मी, मुंबई यांचे "वचन अनुभुती" हा आध्यात्मिक संगीताचा कार्यक्रम होणार आहे. डॉ. राजशेखर मठपती, बेगलोर यांच्या "गडीनाड कन्नड साहित्य संस्कृती समस्या" या विशेष उपन्यासाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर अनिता काराजेनगी यांचे "सोलापूर जिल्ह्यातील वचन साहित्य" या विषयावर प्रवचन होईल. त्यानंतर डॉ. गुरुसिद्धय्या स्वामी यांचे "सोलापूर जिल्ह्यातील संत साहित्य" या विषयावर विवेचन होईल. त्यानंतर डॉ. शिवानंद तडवळ यांचे "सोलापुरातील आधुनिक कन्नड साहित्य या विषयावर व्याख्यान होईल. त्यानंतर डॉ. सुजाता शास्त्री यांचे "सोलापुर जिल्ह्यातील भाषा व संस्कृती" या विषयावर व्याख्यान होईल. दुपारी २ ते ४


(पान 2 वर..)


# आता सरकारी कार्यालयांत मराठी अनिवार्य

## अन्यथा कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मराठी भाषा धोरण जाहीर होऊन जवळपास वर्ष होत आले, तरीही सरकारी कार्यालयांत मराठीबाबत पुरेशी जागरुकता दिसत नसल्याने राज्य सरकारने याबाबत पुन्हा आदेश काढले आहेत. सरकारी कार्यालयांत मराठीतून संवाद न साधणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यासह, केंद्रीय कार्यालये, बँकांमध्ये फलक, अर्जांची भाषा मराठीच असावी आणि संस्थांची नावे मराठीच वापरावीत, या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यापासून तिचे संवर्धन आणि प्रसारासाठी विविध सूचना आणि निर्देश राज्य सरकारकडून जारी करण्यात येत आहेत. मार्च




२०२४मध्ये महायुती सरकारने मराठी भाषा धोरण जारी केले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षापर्यंत, म्हणजेच २०४७ पर्यंत पुढील सुमारे २५ वर्षांत मराठी भाषा तिच्या अंगभूत सामर्थ्यासह ज्ञान आणि रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित व्हावी, हा मूळ उद्देश या धोरणामागे आहे.

यात प्रशासकीय पातळीवर मराठी भाषेचा वापर बंधनकारक असावा, यासाठी या शिफारशीची काटेकोर अमलबजावणी करण्याचे निर्देश नियोजन विभागाने सोमवारी पुन्हा जारी केले. यात सर्व सरकारी, निमसरकारी कार्यालये, महामंडळे आणि सरकारी अनुदानित कार्यालयांत मराठी भाषेतूनच बोलणे अनिवार्य असेल.

मराठीत संभाषण न करणारे सरकारी अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुख यांच्याकडे तक्रार करता येऊ शकते. तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. ही कारवाई तक्रारदारास समाधानकारक न वाटल्यास विधिमंडळाच्या मराठी भाषा समितीकडे अपील करता येणार आहे, असे या आदेशात म्हटले आहे.

**बँकांतही मराठी अनिवार्य**

केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये तसेच सर्व बँका इत्यादींमध्ये दर्शनी भागात लावण्यात येणारे सूचनाफलक, अधिकाऱ्यांचे नामफलक, अर्ज नमुने मराठीतून असणे अनिवार्य असेल. तसेच सरकारी-निमसरकारी आस्थापने, महामंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या यांची सरकारने निश्चित केलेली मराठी नावेच कामकाजात वापरली जातील. नवीन नावे निश्चित करताना मराठीतील एकच नाव निश्चित केले जाईल. त्याचे इंग्रजीत भाषांतर न करता येणार नाही. ज्या आस्थापनांना द्विभाषिक नावे आहेत त्यांचा कारभार यापुढे मराठी नावाने होईल, असे या नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.


सावली मायेच्या विश्वासाची...
संघषार्चा वारसा,
प्रगतीचा आरसा,
दादा एक भरवसा
काल आज आणि उद्याही..
अशा आमच्या कर्तबगार दादांना
वाढदिवसाच्या शुभेच्छा...



डॉ. श्री. कुमार शंकर करजगी

संकल्प मानवतेचा...

सोलापूरचे वैभव म्हणजे जुनी मिल ही मिल बंद पडली आणि अनेक कामगार बेकार झाले.या कामगारांच्या कष्टाचा पैसा मिळवून देण्यासाठी परमेश्वरांनी मला शक्ती दिली.त्यात मी यशस्वी झालो.या कार्याचे दखल घेऊन देशाचे नेते श्री. शरदचंद्र जी पवार साहेब यांनी मला सोलापूरातील लक्ष्मी विष्णू मिल मधील कामगारांच्या हक्कासाठी पुढे होण्यास सांगितले आणि साहेबांच्या आदेशाने मी तो देखील लढा यशस्वी करून दाखविला. आज पर्यंत मी अनेकांना मदत केली आहे आणि आता वयाच्या पंच्याहत्तरीत मी एक संकल्प केला आहे.माज्या सत्याग्रहात १० वर्ष १८० सत्याग्रहिनी भाग घेतला. त्यांच्या साठी मी शहराच्या मध्यवर्ती भागातील सुमारे २५ कोटीची जागा मोफत देऊन त्यांना त्या ठिकाणी मोफत घरे बांधून देण्याचा संकल्प केला आहे.

शुभेच्छुकः मोहिनी वॉटर पार्क, कंदलगाव

## संपादकीय

# काय खरे काय खोटे ?

मराष्ट्रपतींच्या अभिभाषणावर प्रतिक्रिया देताना 'त्यांचे भाषण बोरिंग होते' असे वक्तव्य राहुल गांधी यांनी केले होते, तर 'एवढे लांब भाषण देताना बिचाऱ्या राष्ट्रपती थकून गेल्या' असे विधान सोनिया गांधी यांच्याकडून आले. त्यावरून निर्माण झालेले वादळ जेमतेम शमले असतानाच, आज पुन्हा राहुल गांधी यांच्या संसदेतील एका वक्तव्यावरून नवीन वादंग उभे केले गेले आहे. संसदेत आज भाषण करताना राहुल गांधी असे म्हणाले की, 'भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर हे अमेरिकेत पंतप्रधान मोदींना, ट्रम्प यांच्या शपथविधीसाठीचे निमंत्रण मागण्यासाठी गेले होते.' त्यावरून हे वादंग सुरू करण्यात आले आहे.

राहुल गांधी यांचे आज लोकसभेत झालेले भाषण बऱ्यापैकी चमकदार होते, पण त्यातील ज्या दोन मुद्द्यावर सभागृहात गदारोळ झाला त्यातला हा एक प्रमुख मुद्दा होता. राहुल गांधी हे देशाच्या पंतप्रधानांचा आणि देशाचा अपमान करीत आहेत असे वक्तव्य करीत केंद्रीय मंत्री किरेन रिजीजू यांनी त्यांना सभागृहातच प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. बाकीच्या भाजप सदस्यांनीही बराच गदारोळ केला. संसदेचे हे कामकाज पाहात असताना आज एक वेगळीच गंमत अनुभवाला आली. राहुल गांधी यांचे आजचे भाषण सफाईदार इंग्रजीत होते, त्यांनी एस जयशंकर अमेरिकेत मोदींना निमंत्रण मिळवण्यासाठी गेले होते, असे विधान केल्यानंतर बऱ्याच वेळाने ही बाब सत्ताधारी पक्षाच्या लक्षात आली आणि मग त्यांनी हा गदारोळ सुरू केला. एरवी त्या क्षणी सत्ताधारी वातावरण आरडाओरडा सुरू होतो पण यावेळी थोडा तो विलंबाने झाला. राहुल गांधी यांच्या विधानावर पलटवार करण्यास जयशंकर यांनी मात्र फार विलंब लावला नाही. जयशंकर यांनीही लगेच एक निवेदन सभागृहाबाहेर जारी करत राहुल गांधी खोटं बोलत असल्याचे म्हटले आहे. आपण त्यावेळी अमेरिकेत बायडेन प्रशासनाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि अन्य अधिकाऱ्यांशी चर्चा करायला गेलो होतो, मोदींसाठी निमंत्रण मागायला गेलो नव्हतो, असे जयशंकर यांनी म्हटले असून त्यांनी राहुल गांधींकडे याबाबत अधिक स्पष्टीकरण देण्याची मागणी केली आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमाला चीनचे अध्यक्ष आणि अन्य देशांच्या राष्ट्रप्रमुखांना निमंत्रण दिले गेले होते, पण भारतीय पंतप्रधानांना हे निमंत्रण नव्हते. त्यामुळे हे निमंत्रण पदरात पाडून घेण्यासाठीच जयशंकर तातडीने अमेरिकेला गेले असल्याची बातमी प्रसिद्धी माध्यमांमध्ये त्याच सुमाराला चर्चेत होती. या चर्चेलाही बरेच दिवस झाले, पण त्यावेळी मात्र सरकारकडून कोणताही खुलासा आला नाही. किंबहुना ही बातमी माध्यमांमध्ये येऊच दिली गेली नाही, पण जेव्हा राहुल गांधी यांनी संसदेत त्या आधारावर आरोप केला त्यावर मात्र आता जोरदार वादंग सुरू झाला आहे. यातले नेमके खरे काय आणि खोटे काय याचा खुलासा झाला तर तो आता अमेरिकेतूनच होईल, अन्यथा येथे जयशंकर आणि सरकारने राहुल यांच्या दाव्याचा इन्कार करीत त्यांना धारेवर धरले आहे.

राहुल गांधी यांचे आजचे संसदेतील भाषण विविध मुद्द्यांवर भाष्य करणारे होते. जातीय जनगणना आणि दलित तसेच अन्य मागासवर्गीयांवर होणाऱ्या अन्यायाचे नेहमीचे मुद्दे त्यांनी यावेळी उपस्थित केलेच; पण त्यांचे हे भाषण सुरू असताना आज बऱ्याच दिवसांनी खुद्द पंतप्रधान सभागृहात उपस्थित होते. त्यामुळे पंतप्रधानांना डिवचण्याची संधी राहुल गांधींनी सोडली नाही. चीनने भारतात केलेल्या आक्रमणाविषयी भाष्य करताना राहुल गांधी म्हणाले की, 'चीनने भारतात घुसखोरी केल्याचा पंतप्रधानांनी इन्कार केला; पण देशाच्या लष्कर प्रमुखांनी मात्र पंतप्रधानांचा हा इन्कार खोडून काढत चीनने भारतीय भूमीवर आक्रमण केल्याची बाब स्पष्टपणे मान्य केली, असे ते म्हणाले.

त्यावरूनही सत्ताधारी बाकावरून जोरदार प्रतिवाद सुरू झाला. पण त्याला तितक्याच तत्परतेने राहुल गांधी यांनी पुन्हा संदर्भासहित स्पष्टीकरण दिल्याने हा मुद्दा तेथेच थांबला. पण जयशंकर यांच्या अमेरिकन दौऱ्याविषयीचे वक्तव्य मात्र संसदेच्या कामकाजानंतरही गाजत राहिले आहे. या भाषणात राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत लोकसभेनंतर केवळ पाच महिन्यांत तब्बल 70 लाख मतदार कसे वाढले, असा विषय उपस्थित करून निवडणूक आयोगाच्या आणि सरकारच्या कामकाजाबद्दल काही तिखट प्रश्न उपस्थित केले; पण त्यावर मात्र सत्ताधारी भागावर शांतताच दिसली.

राहुल गांधी लोकसभेतील विरोधी पक्षनेते आहेत, त्यांचे पद घटनात्मक स्वरूपाचे आहे आणि त्यांच्या प्रत्येक वक्तव्याची बारीक स्वरूपाची छाननी होत असल्याने प्रत्येक वाक्य किंवा विधान ते अतिशय खात्रीपूर्वक स्वरूपात करत असतात असा अनुभव आहे. त्यामुळे त्यांनी जयशंकर यांच्या बाबतीत केलेले विधान धादांत खोटे आहे असे ठोसपणे म्हणता येणार नाही, पण त्याच वेळेला सरकार मात्र राहुल गांधी साफ खोटे बोलत आहेत असे जर म्हणत असेल, तर याची सत्यासत्यता कशी पडताळायची हा देशातल्या सामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे. आता बहुधा अमेरिकन प्रशासनातील अधिकाऱ्यालाच एखाद्या पत्रकार परिषदेत यावर प्रश्न विचारला जाईल आणि त्यावर त्यांच्याकडून जे उत्तर येईल त्यातून नेमका खुलासा लोकांना होईल अशी अपेक्षा आहे.

पण मुद्दा असा आहे की संसदेचे महत्त्वाचे अधिवेशन सुरू असताना आणि कुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनेबद्दल प्रामुख्याने चर्चा होणे अपेक्षित असताना हे असले कमी महत्त्वाचे मुद्दे फार रंगवून गाजवले जातात त्याविषयी लोकांमध्ये नाराजी आहे. अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर देशाच्या आर्थिक बाबतीतही सांगोपांग चर्चा होणे अपेक्षित आहे, पण संसदेचा चर्चेचा रागरंग मात्र भलत्याच दिशेने जाताना दिसतो आहे.

पान १ वरून

## सोलापूरात शनिवारी...

या वेळेत "बहुभाषिक कवीगोष्टी" सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक सत्रात शंकरलिंग महिला मंडळ, सोलापूर यांचे "अमर ज्योती अक्क महादेवी" या विशेष नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर शहरातील विविध शाळांतील विद्यार्थी वचन नृत्य, भरतनाट्यम्, जानपद गीतगायन करणार आहेत.या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने कन्नड भाषिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस भीमाशंकर हुबळी, विनोद दुधनी, मीना बागलकोटी, रूपा स्वामी, सुनिल सोलापुरे, निर्मला लातुरे, महादेवी तेली, रेणुका बागलकोटी आदी उपस्थित होते.

# संघर्ष, संयम आणि सेवेचा त्रिवेणी संगम... डॉ.कुमार दादा करजगी



सोलापूर शहर म्हणजे स्वातंत्र्य पूर्व काळातील भारतातील मॅचेस्टर सिटी म्हणून ओळखले जात. पण पुढे याच सिटीला मिल मालकांचा अरेरावीपणा आणि मिल कामगारांची गळचेपी या कारणास्तव इथल्या तब्बल ८ कापड गिरण्या हळूहळू बंद पडल्या. कापड गिरण्यांची धडधड जशी बंद झाली तशी इथल्या मिल कामगारांच्या काळजात धडधड सूरू झाली.आपल्या हाताचे काम तर कायमचे बंद झाले आणि आपल्या कष्टाचा पैसा देखील हातात येण्यापासून दूर पळू लागला.आपल्या घामाचे दाम आपल्याला आता मिळेल की कधीच मिळणार नाही या शंकेनी मनात हूरहूर माजविले.बंद असलेल्या मिलच्या गेटसमोर रोज कामगार जमा व्हायचे आणि आपले पैसे मिळतील का याची वाट पाहायचे. याच कालचक्रात सोलापूर शहर हे रसातळाला कधी गेले हे समजलेच नाही. अंतः अस्ति आरंभ या वेदाप्रमाणे या कामगारांच्या पाठीशी उभा राहिला एक मिल कामगार पुत्र ज्यांची घरची परिस्थिती अतिशय साधारण सकाळी जेवण मिळाले तर संध्याकाळचे जेवण मिळेल का याची शाश्वती नसणारे करजगी कुटुंबातील एक हरहुन्नरी पुत्र कुमार करजगी.

प्रत्येकाला आपलं स्वतःच जग जिंकायचं असतं, पण खरा विजेता तोच जो दुसऱ्यांनाही जिंकण्याची प्रेरणा देतो.असे कुमार दादा यांनी आपल्या कार्यातून जग जिंकण्याची स्वप्ने पाहत असताना आपल्या सोबत असणाऱ्यांना देखील जिंकण्याची प्रेरणा देणारे दादा. आपल्या आयुष्यात पुढे काय लिहून ठेवले आहे याची त्यांना कल्पना नव्हती पण १९६३ साली बंद झालेल्या जुनी मिलमधील कामगारांसाठी त्यांनी लढा उभारला तब्बल ३३ वर्षानंतर त्यांच्या लढ्याला यश मिळाले.

हजारो मिल कामगारांना त्यांच्या कष्टाचा पैसा मिळवून दिला.या अभूतपूर्व लढ्यानंतर दादांनी आपले सामाजिक कार्य सुरु ठेवले.याच कालावधीत दादांना एक मोठा धक्का बसला आपला एकुलता एक मुलगा दादांना सोडून गेला. या दुःखातून दादा बाहेर पडण्याचे एकमेव कारण म्हणजे आपल्या मुलाची राहिलेली अधुरी स्वप्ने पूर्ण करायची या उद्देशाने. आपला एक मुलगा गेला आता आपण हजारो मुलांचे पालक बनायचं म्हणून सोलापूर शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आपल्या मुलाच्या नावाने नागेश करजगी ऑर्किड स्कुल सुरु केली. इथे शिकणाऱ्या प्रत्येक मुलामध्ये दादा आपल्या मुलाला बघत असतात. या मुलांच्या प्रगतीसाठी दादांनी आद्ययावत अशी शिक्षण प्रणाली उभी केली आहे. यामध्ये ई लर्निंग, वन टू वन ई लर्निंग क्लास, रोबोटीक लॅब,टॉकिंग ट्री, ऑनलाईन शिक्षणासाठी स्वतंत्र्य टीव्ही चॅनेल सुरु केले. डीजीटल क्लासरूम पासून सुरु झालेली शाळा आज पेपरलेस शाळेच्या दिशेने वाटचाल सुरु आहे.प्रवेशावेळी एक रुपयाही डोनेशन न घेणारी संस्था म्हणून नागेश करजगी ऑर्किड स्कुल कडे पाहिले जाते.सुरुवातीला १३१ विद्यार्थी संख्या असलेल्या

शाळेत आज १६०० हुन अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत हे दादांच्या अथक परिश्रमाचे फळ आहे असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही.

ज्या पावलांना लहानपणापासूनच ऊन, वारा, पाऊस, पाणी यांच्याशी संघर्ष करायची सवय असते अशी पावले शेवट पर्यंत कधीच थांबत नाहीत. माणसाच्या आयुष्यात तीन संघर्ष ठरलेली असतात एक म्हणजे जगण्यासाठीचा संघर्ष, दुसरा स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठीचा संघर्ष आणि निर्माण केलेली ओळख जपण्यासाठीचा संघर्ष.जन्माला येऊन काहीतरी उत्तुंग करण्याची जिद्द बाळगावी, विचारांवर विश्वास ठेवावा आणि आपल्या कर्तृत्वाने ते साध्य करावे.. अशी प्रेरणा देणारे आमचे आधारवड दादा.

दादांना या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने ऑर्किड परिवाराकडून मनस्वी शुभेच्छा.

**- संदीप बुरकूल**

# प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या कामांना गती द्या - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोनमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी 19 लाख 66 हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवले आहे. आतापर्यंत 16 लाख 81 हजार 531 घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा वॉररुममध्ये आढावा घेऊन या योजनांना गती देण्याचे निर्देश दिले. यामध्ये आरोग्य, गृहनिर्माण व पाणी पुरवठा विभागाच्या योजनांच्या सद्यस्थितीचा जिल्हानिहाय आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री पंकज भोयर, योगेश कदम, मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन फडणवीस म्हणाले की, भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे, ही आनंदाची बाब आहे. मात्र, उर्वरित लाभार्थ्यांना तातडीने जमिन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समन्वयाने मार्ग काढावेत. ज्या जिल्ह्यांत घरकुलांचे उद्दिष्टपूर्ती कमी आहे, तेथील जिल्हाधिका यांनी ती पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावेत. तसेच घरकुल योजनेतील अडचणी दूर करून कामांना वेग द्यावे. गायरान जमिनींवरही आवास योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी. आवास योजनांसाठीच्या जमिनींच्या समस्या सोडविण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्राधान्य द्यावे.

आवास योजनांच्या घरकुलांसाठी वाळू, वीटा व सिमेंट आदी एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी घरकुल मार्ट संकल्पना राबविण्यात यावी. यासाठी बचत गटांचे सहाय्य घ्यावे. तसेच आवास योजनांसाठी वाळू देण्यासंदभार्तील परिपत्रक पुन्हा निर्गमित करण्यात यावे. तसेच महसूल विभागाने गावठाणासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. शहरी भागातील आवास योजनांना गती देण्यासाठी नगर विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश द्यावे. तसेच आवास योजनांच्या प्रगतीची माहिती नियमित अद्ययावत करावी. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोनची मंजुरी, कामे आदी कार्यवाही स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेगाने करावी, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

### आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी

आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा लाभ राज्यातील रुग्णांना मिळावा, यासाठी नोंदणीच्या कामाला गती द्यावी. तसेच यामधील मानवी हस्तक्षेप विरहित डिजिटल यंत्रणा सज्ज करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

या दोन्ही योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळण्यासाठी जास्तीत जास्त खाजगी रुग्णालयाचा तसेच मुंबई शहर व उपनगरातील महापालिकेच्या रुग्णालयांचाही समावेश करावा. आयुष्मान कार्डच्या प्रत्यक्ष १०० टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करून आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी. तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेसाठीही आयुष्मान कार्ड सारखे कार्ड तयार करण्यात यावे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनामध्ये रुग्णालयांच्या समावेशासाठी जिल्हाधिका यांनी स्वतः लक्ष घालावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### जल जीवन मिशनची कामे वेगाने करा

जल जीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक उपलब्ध व्हावे यासाठी जलजीवन मिशन योजनेतील कामे गतीने, कालमयार्देत व गुणवत्ता पूर्ण करावीत. या योजनांचे सोलरायजेशन झाल्यास वीजेबरोबरच वीज बिलात बचत होईल, असेही फडणवीस म्हणाले.

नळाच्या पाण्याची आणि स्त्रोतांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी वषार्तून दोनदा जीवाणूजन्य आणि एकदा रासायनिक चाचणी करावी. पाणी गुणवत्ता चाचणी प्रयोगशाळांमधील पदभरती तत्काळ करावी, असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# बारावी, दहावीच्या परीक्षांदरम्यान कॉपीमुक्त अभियान यशस्वी करा - मुख्य सचिव सुजाता सौनिक

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च 2025 ची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. बारावी) परीक्षा दि. 11 फेब्रुवारी ते दि. 18 मार्च 2025 आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. दहावी) परीक्षा दि. 21 फेब्रुवारी ते दि. 17



मार्च 2025 या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 100 दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त आणि निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने प्रयत्न करण्याचे निर्देश दिले होते. या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव श्रीमती सौनिक यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत यासंदर्भात आढावा घेतला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यावेळी उपस्थित होते. तर शालेय शिक्षण आयुक्त, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

## प्रबोधन

# ग्लोबल वॉर्मिंगचे संकट / प्रगती करा प्रगत जातील । नव्या घरामध्ये

कविवर्य कुसुमाग्रजांनी कोलंबसाचे गर्वगीत ही कविता लिहून एकट्या कोलंबसचाच नव्हे, तर जगातील अनेक ध्येयवेड्यांचा सन्मान केला आहे. वास्तविक कोलंबसला शोध घ्यायचा होता भारताचा! आणि त्याने शोध घेतला अमेरिकेचा. वाट चुकलेला हा दर्यावर्दी वेडा, अमेरिकेची जमीन जर एक दिवस उशिरा दिसली असती, तर ती पाहायला जिवंत राहिला नसता. कारण अनेक दिवसांच्या जलप्रवासाने, अन्नपाण्याच्या तुटवड्याने, घराच्या ओढीने त्रस्त झालेल्या खलाशांनी त्याला ठार मारायचं ठरवलं होतं. ते आपला बेत पूर्ण करणार; तोच अमेरिका दिसली आणि कोलंबसाचा मृत्यू टळला. त्याचं गर्वगीत लिहिताना कुसुमाग्रजांनी अनंत आमुची ध्येयासक्ती, अनंत अन् आशा, किनारा तुला पामराला असं म्हणून त्याच्या ध्येयवादी मनोवृत्तीचं कौतुक तर केलंच आहे; पण त्याचबरोबर ध्येयहीन माणसांना पामर म्हणून हिणवलंसुद्धा आहे. कोलंबसच्या बोटीवर त्याच्याशिवाय बाकीचे सारे पामरच होते.

अवकाश व भौतिकशास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांचा उल्लेख आधुनिक कोलंबस असा केला पाहिजे. त्यांनी एका भाषणात निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित संकटांतून पुढील शंभर वर्षांत मानववंश कसा टिकू शकेल? असा प्रश्न विचारून विचारवंतांना अस्वस्थ करून सोडलं आहे. या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न जगातील वीस हजारांहून अधिक लोकांनी केला. म्हणजे जगातील सहाशे–सातशे कोटी लोकांपैकी फक्त वीस हजार लोकांना हा प्रश्न कळला. म्हणजे जगात पामरांची संख्या ९९. ९७ टक्के असल्याचंच आणि कोलंबसच्या बोटीवरील निर्बुद्ध खलाशांचेच आपण सारे वंशज आहोत, हेही स्पष्ट झालं.

आज आपणाला ग्लोबल वॉर्मिंग अर्थात, तापमानात अचानक होणारी प्रमाणाबाहेर वाढ, अणुस्फोटांचा किरणोत्सारीपणा, विषाणुप्रसाराचा धोका, धार्मिक कडवेपणातून निर्माण होणारी, आत्मघातासह इतरांचा घात करण्याची विकृत बुद्धी, यांचा विचार पुरेशा गंभीरपणे करावा लागणारच आहे. जगाची शंभरी भरण्याची उलट मोजणी आता सुरू झाली आहे, हे मात्र नक्की.

मनुष्यजातीला पुढे आयुष्य लाभेल ते शोध–संशोधनानेच ! तत्त्वविचाराने नव्हे. मात्र हे संशोधन भारतात होणार नाही, हेही तितकंच खरं. हॉकिंगच्या प्रश्नाचं उत्तर देताना आपल्या राष्ट्रपतींनी– 'भारताचा सांस्कृतिक वारसा आणि युवाशक्ती यांची योग्य सांगड घातल्यास हे संकट दूर होईल,' अशी आशा व्यक्त केलीय. त्यांचा विचार संस्कृतीशी संबंधित आहे आणि आपली संस्कृती ही आध्यात्मिक असल्याने सर्व तरुणांनी वेदातील शांतिमंत्र म्हणावा, म्हणजे सारं आबादी आबाद होईल, असं त्यांचं म्हणणं असावं. जलमार्ग चुकीचा निवडून कोलंबस चुकीच्या जागी पोचला आणि आपले राष्ट्रनेते चुकीचा विचार निवडून आपणाला अधिक चुकीच्या जागी नेत आहेत. भारताची संस्कृती थोर आहे, ती मार्गदर्शक आहे, ती जगाचं नेतृत्व करण्यास समर्थ आहे, असं म्हणणं हे फारच विनोदी आहे. ज्या संस्कृतीने आपल्या पुत्रांचं कल्याण केलेलं नाही, ती इतरांचं कल्याण काय करणार ?

स्टीफन हॉकिंग यांनी शुद्ध भौतिक चिंता व्यक्त केली, तर त्याला आमच्या संस्कृतीनिष्ट अध्यात्म–भ्रमिष्टांनी शांतिमंत्राचा उपाय सांगितला. भटोबा तर, यज्ञ करा त्याच्या धुरातून सदेह वैकुंठाला जाता येतं, असं म्हणेल. श्रीश्रीश्रीजी– दुःख टाका, आनंदाने जगा म्हणेल, आसाराम– अब राम बोलना पडेगा म्हणेल, रामदेवबाबा– प्राणीजन्य भुकटी खा; सर्व संकट दूर होईल, असं सांगेल. कुणी माँ किंवा बहेन आपल्या कुशीत येण्यास सांगेल. कुणी बालाजीला अकरा कोटी अर्पण करा म्हणेल, सिद्धिविनायक तर ब्रह्मांडाचा स्वामीच आहे! स्टीफनचे शिष्य परग्रहावरून आम्ही नामशेष झालेले पाहून सुटले बिचारे म्हणतील. तो काळ फार दूर नाही. हे टाळण्यासाठी–

माणसाला म्हणू । नका सृष्टीपुत्र
निसगार्चा पुत्र । सुद्धा नव्हे ॥ १
सृष्टीचा विध्वंस । करतो माणूस
निसगार्चा नाश । करी मूर्ख ॥ २
मुळासह खातो । लागते जे गोड
स्वभावात खोड । अशी त्याच्या ॥ ३
असा स्वार्थी प्राणी शोधून मिळेना
धरतीची दैना । केली त्याने ॥४
पर्यावरणाचा । करुनिया नाश
ओढवून त्रास । घेतलाहे ॥ ५
हवापाणी त्याने । प्रदूषित केले
मरण घेतले । ओढवून ॥ ६
शहाणे म्हणती । सोडा आता घर
परग्रहावर । करा वस्ती ॥७
प्रगत जातील । नव्या घरामध्ये
मागासलेले । ते फुका मेले ॥८
शेखचिल्ली हीच । माणसा उपाधी
बसलेली फांदी । तोडणारा ॥ ९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# महिलांसाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारावे - महिला व बालविकास मंत्री तटकरे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महिलांना औद्योगिक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारण्याच्या प्रक्रियेस गती द्यावी. बाजारपेठ असलेल्या तालुकास्तरावर हे भवन उभारण्यात येणार असून, यामध्ये 'माविम'च्या जास्तीत जास्त महिला बचतगटांना व्यवसाय करण्याची संधी प्राप्त होणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे यांनी सांगितले. मंत्रालय येथील दालनात रोहा येथे गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करणे, तालुकास्तरावर अस्मिता भवन उभारणे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे कामकाज, राज्य बालहक्क संरक्षण आयोग तसेच १०० दिवस कृती आराखड्याबाबत बैठक झाली. यावेळी विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव, आयुक्त कैलास पगारे, 'माविम'च्या कार्यकारी संचालक वर्षा लटा, राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शहा, विभागाचे सहसचिव वि. रा. ठाकूर, अवर सचिव सुनिल सरदार, उपसचिव आनंद भोंडवे आदिंसह अधिकारी उपस्थित होते. महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे म्हणाल्या की, श्रीवर्धन येथे सोलार फिश ड्राईंग प्रोजेक्ट अंतर्गत महिला आर्थिक विकास महामंडळ मार्फत नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण उद्यम विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत बाजारभिमुख उद्योग विकास घटकांतर्गत शेती, शेतीसंलग्न व बिगर शेती आधारित उद्योगांना व नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

याचबरोबर रोहा येथील गारमेंट प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठीचे युनिट शहरासह ग्रामीण भागातही सुरू करण्यात यावे. प्रकल्पासाठी पात्र महिलांना योग्य प्रशिक्षण आणि मानधन मिळण्यासाठी पारदर्शक कार्यप्रणाली राबवावी. या प्रकल्पाच्या माध्यमातून जास्तीत जास्त महिलांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देशही तटकरे यांनी दिले. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमत्त 'माविम' अंतर्गत असलेल्या जास्तीत जास्त बचतगटांना व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच 'माविम'चे कार्य ग्रामीण भागातही पोहोचावे यासाठी राज्यस्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्याचे निर्देश मंत्री कू. तटकरे यांनी दिले. बालकांच्या हक्क आणि संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामधील रिक्त पदे कायम स्वरुपासह बाह्यस्त्रोत व कंत्राटी पद्धतीने भरण्यात येणार आल्याची माहिती सचिव अनुपकुमार यादव यांनी दिली.

### राज्यस्तरीय बाल महोत्सवात साहित्यकि बालकांना व्यासपीठ उपलब्ध करावे

बालगृह व निरीक्षण गृहातील प्रवेशितांसाठी दरवर्षी राज्यस्तरीय बालमहोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. या महोत्सवाअंतर्गत जी बालके कथा, कविता लिहितात, ज्यांचे साहित्य प्रसिद्ध आहे अशा साहित्य क्षेत्राशी निगडीत असलेल्या बालकांसाठी विशेष व्यासपीठ या बालमहोत्सवात उपलब्ध करून देण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे यांनी दिले. महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे यांनी विभागातील विविध योजना आणि कामांचा तसेच १०० दिवस कृती आराखड्यासंदर्भात आढावा घेतला. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत गरोदर महिला, स्तनदा माता, बालके यांना घरपोच आहार, लाभार्थी बालकांचे ग्रोथ मॉनिटरींग, लाभार्थ्यांना गृहभेटीद्वारे मार्गदर्शन, पोषण विषयक जनजागृतीकरिता समुदाय आधारित कार्यक्रम, ग्राम बाल विकास केंद्र, नागरी बाल विकास केंद्र, अंगणवाडी केंद्रांना शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय, जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, भिक्षेकरींच्या कामाचा मोबदला, पिंक रिक्षा, लाडकी बहीण योजना, फिरते पथक यासंदर्भातही यावेळी आढावा घेण्यात आला.

## वात्रटिका

### मुक्ताफळे नटाची

ना सूर असतो ना ताल
तरी काढतात गळे...
नेत्या बरोबर अभिनेता ही
उधळू लागला मुक्त फळे...
(रा)हुल म्हणावे की हुकलेला
पराक्रमावर शंका घेतो...
इतिहास लाच देऊन नाही
तर पराक्रमाने घडत असतो...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नई जिंदगी नागरिक आरोग्य केंद्रामार्फत १०० दिवस टी बी कॅम्प



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** टी बी मुक्त भारत अभियानाअंतर्गत आज दिनांक ०१/०२/२०२५ रोजी बापूजी नगर येथे कॅम्प घेण्यात आले त्यामध्ये सोलापूर शहर क्षयरोग अधिकारी डॉ.अरुंधती हराळकर, मेडिकल ऑफिसर नई जिंदगी ना. आ.केंद्राचे डॉ.गीता गावडे, न्यू लाईफ क्लिनिकचे डॉ.सोहेल मुजावर, व आरोग्य सेविका लिना पवार उपस्थित होते, यावेळी १०० दिवस टीबी कॅम्पमधील माहिती देण्यात आली व आलेल्या सर्व नागरिकांचे आरोग्य तपासणी व एक्स-रे करण्यात आले. यामध्ये एकूण 93 नागरिकांचे स्क्रीनिंग करण्यात आले. यावेळी नागरिक आरोग्य केंद्र नई जिंदगी येथील सिस्टर्स, NTEP स्टाफ, लॅब टेक्निशन, संबधित सर्व आशा वर्कर उपस्थित होते.

# नातेपुते शहराचा प्रारूप विकास आराखडा रद्द करण्याच्या ठरावास मंजुरी : अतुल पाटील

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते विकास आराखड्याबाबत अनेक त्रुटी आढळल्या. अस्तित्वात नसणारे रस्ते नकाशात दाखवण्यात आले. मूळ नकाशा प्रमाणे गट नंबर न दाखवता दुसऱ्या ठिकाणी दाखवण्यात आले. रहिवासी घरी पाहून रस्ते आरक्षित करायला पाहिजे होते मात्र तसे झाले नाही त्यामुळे नातेपुते शहराचा प्रारूप विकास आराखडा रद्द करण्याबाबत लोकप्रतिनिधीकडून ठरावास मंजुरी घेण्यात आली असल्याचे नातेपुते नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अतुल पाटील यांनी सांगितले.

ते नातेपुते नगरपंचायत येथे नातेपुते शहराच्या विकास आराखड्याबाबत घेण्यात आलेल्या विशेष सभेत बोलत होते.

सभेसाठी नगराध्यक्षा अनिता लांडगे, उपनगराध्यक्ष अतुल पाटील, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक मालोजीराजे देशमुख, सुरेंद्र सोरटे, संगीता काळे, आण्णा पांढरे, रणजीत पाढरे, स्वाती बावकर, उत्कषाराणी पलंगे, दीपिका देशमुख, अविनाश दोशी, भानुदास राऊत, दीपक काळे, सविता बरडकर, शर्मिला चांगण, माया उराडे व मुख्याधिकारी माधव खांडेकर उपस्थित होते.



नातेपुते विकास आराखड्या बाबत नातेपुते शहरातील नागरिकांनी बऱ्याच मोठ्या प्रमाणात हरकती घेतल्या होत्या. परंतु हा विकास आराखडा नगर रचना कार्यालय सोलापूर यांनी सर्वे तयार केला होता. परंतु विकास आराखड्याबाबत केलेला सर्वे हा चुकीचा असल्याचे लोकप्रतिनिधी यांनी निदर्शनास आणून दिले होते. त्यामुळे सोमवार दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ रोजी नातेपुते नगरपंचायत येथे लोकप्रतिनिधी यांनी विशेष सभा घेऊन सदर आराखडा संबंधित विषय घेऊन सभागृहासमोर ठेवला व सभागृहाने बहुमताने सदर विकास आराखडा रद्द करण्याचा ठराव मंजूर करून सदर विकास आराखडा रद्द करण्यात यावा असे लोकप्रतिनिधी यांनी बहुमताने सांगितले.

# जिल्ह्यातील कृषी उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी रेल्वेकडून प्रयत्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** फळे, भाजीपाला आणि साखर उत्पादनात सोलापूर जिल्हा अग्रेसर असून या कृषी उत्पादित मालाला जलदगतीने बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने सोलापूर रेल्वे प्रयत्नशील आहे. जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी रेल्वे वाहतुकीच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक सुजित मिश्रा यांनी सांगितले.सोमवारी, विभागीय रेल्वे कार्यालयात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून संवाद साधला. वैष्णव यांनी केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वेसाठी २३ हजार कोटी रुपये तरतूद केली आहे. सध्या राज्यात एक लाख ७० हजार कोटी रुपयांची रेल्वेची विकासकामे होत असल्याचे सांगितले. त्यानंतर डॉ.मिश्रा यांनी सोलापूर रेल्वेसाठी अर्थसंकल्पात किती रुपये तरतूद केली आहे. याची माहिती दोन- तीन दिवसांत मिळेल असे सांगून ते म्हणाले, द्राक्ष, डाळिंब, फळभाज्या आणि साखर उत्पादनात सोलापूर जिल्हा अग्रेसर आहे. रेल्वे प्रशासन स्वतःहून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत

जाऊन रेल्वेच्या माध्यमातून काय सेवा देता येईल याची माहिती शेतकऱ्यांकडून घेण्यात येत आहे. भविष्यात सोलापूरच्या विकासात रेल्वे सेवेचे महत्त्वपूर्ण योगदान राहणार आहे. भैय्या चौकातील रेल्वे पुलाचा प्रश्न राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे प्रशासन अतिशय संवेदनशीलतेने हाताळत आहे. येथील सर्व पैलूंवर रेल्वे प्रशासन विचार करीत असल्याचे त्यांनी सांगितले. दौंड- कलबुरगी रेल्वे सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी रेल्वे बोर्डाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. त्यावर लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची शक्यता आहे. यावेळी वरिष्ठ वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# भाजी विक्रेत्यांमुळे विजापूर रस्त्यावर अपघाताला निमंत्रण



**सोलापूर (कटुसत्य वृत्त):** 'ओ टमाटे घ्या हो दहा रुपये किलो, फ्लावर घ्या हो वीस रुपयाला गड्डा, मेथी घ्या हो दहाला दोन' अशी आरोळी नवीन नाही. मात्र ऐन धर्मवीर संभाजी तलावाशेजारी रेल्वे पुलावर सायंकाळच्या वेळी रिक्षा उभा करून स्वस्त भाजीपाला विक्री सुरू असते. एके दिवशी हा स्वस्तातील भाजीपाला महागात पडणार आहे. अपघाताला निमंत्रण देणारी ही भाजी विक्री कुणाचा तरी जीव घेऊ शकते. जुळे सोलापूरच्या प्रत्येक रस्त्यावर भाजीपाला विक्री सुरू आहे. सर्वत्र पदपथ भाजी पाला व फळे विक्रेत्यांनी काबीज केले आहेत. विजापूर रस्त्यावर धर्मवीर संभाजी तलावापासून थेट सैफुलपर्यंत रस्त्याच्या डाव्या बाजूला सर्वत्र भाजीपाला व फळे विक्रेत्यांनी दुकाने थाटलेली आहेत. ही स्थिती भारती विद्यापीठासमोरील रस्ता तसेच डीमार्ट शेजारी आसरा पुलावरून येणाऱ्या रस्त्याची आहे. या मार्गावर टिळक विद्यापीठाशेजारीही रस्त्याची संपूर्ण एक बाजू भाजी विक्रेत्यांनी बळकावली आहे. सर्वत्र भाजी विक्री सुरू असताना धर्मवीर संभाजी तलावाशेजारी रेल्वे पुलावर दररोज सायंकाळी स्वस्तात भाजी विक्री करणारी रिक्षा उभी असते. पुलाच्या तोंडावरच ही रिक्षा उभी असल्याने ग्राहक रस्त्यावर वाहने लावून स्वस्तातील भाजी खरेदी करतात. यामुळे अपघाताला निमंत्रण मिळत असून सिग्नल सुटताच येथे वाहनांची गर्दी होते. या भाजी विक्रेत्यामुळे येथे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयास नॅक कडून बी ग्रेड

**टेंभूर्णी (कटूसत्य वृत्त):-** श्री.विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव (टे.) तालुका माढा संचलित विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय , टेंभुर्णी या महाविद्यालयाला नॅक पुनर्मूल्यांकनात बी ++ ग्रेड मिळाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र कदम आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. नेताजी कोकाटे यांनी दिली.

बंगळूर येथील राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद या केंद्रिय समितीकडून (नॅक- NAAC) यांच्याकडून महाविद्यालयाच्या दुसऱ्या पुनर्मूल्यांकनासाठी २३ व २४ जानेवारी रोजी त्रिसदस्यीय समितीने विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयास भेट दिली. यावेळी अभ्यासक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सोयी- सुविधा, विद्यार्थी सहाय्यता, व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्य आणि विविध उपक्रम आदी घटकांच्या आधारे झालेल्या मूल्यांकनात महाविद्यालयाने २.९४ हा सीजीपीए (CGPA) प्राप्त केला आहे. महाविद्यालयास बी ++ मानांकन प्राप्त झाल्यानंतर प्राचार्य डॉ. महेंद्र कदम म्हणाले की, या यशासाठी श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनराव शिंदे आणि सर्व पदाधिकारी यांचे मार्गदर्शन झाले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांचे सहकार्य झाल्यामुळेच महाविद्यालयास हे यश मिळवता आले.



या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनराव शिंदे, माजी आमदार संजयमामा शिंदे, संस्थेचे अध्यक्ष विक्रमसिंह शिंदे, रणजीतसिंह शिंदे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व टेंभुर्णी येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी महाविद्यालयाचे प्राचार्य महेंद्र कदम, नॅक समन्वयक डॉ.नेताजी कोकाटे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

# राज्यातील विकास काम करणाऱ्या कंत्राटदारांनी पुन्हा एकदा काम बंद आंदोलनाचा इशारा

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विकास काम करणाऱ्या कंत्राटदारांनी पुन्हा एकदा काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. राज्य सरकारच्या केलेल्या विकासकामांची जवळपास ८९ हजार कोटी रुपयांची थकवाकी राहिली असल्याचे कंत्राटदार संघटनांनी म्हटले आहे. त्यामुळे ५ फेब्रुवारीपासून आम्ही काम बंद आंदोलन करत असल्याच्या इशारा या संघटनानी दिला आहे. दरम्यान, राज्यातील पीडब्ल्यूडी इरिगेशन, सामाजिक आदिवासी विकास विभागाचे कंत्राटदारांचेही पैसे मोठ्या प्रमाणात थकीत असल्याने कंत्राटदारांनी पुन्हा एकदा काम बंद आंदोलनाचा इशारा दिला आहे. लाडक्या वहीण योजनेमुळे हा फटका वसत न्याय,असले अस्थिर सरकार पाहिलेले नाही : वडेट्टीवार राज्यातील पीडब्ल्यूडी इरिगेशन, सामाजिक न्याय, आदिवासी विकास विभागाचे कंत्राटदारांचेही पैसे मोठ्या प्रमाणात थकीत आहे. कुणालाच पैसे मिळत नाही. सर्व बोंबाबोंब आहे. शेतकरी, अंगणवाडी सेविका,जलजीवन मिशन, निराधार योजना, रोजगार हमी योजना कुठेही पैसे मिळत नाही. नुसता बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात, अन याच्यासाठी हे सरकार, अशी परिस्थिती आहे. अस्थिर सरकार महाराष्ट्राने पाहिलेले नाही. अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. असल्याची चर्चा आहे. या सर्व विभागांची मिळून तब्बल ८९ हजार कोटी रुपयांची थकवाकी असल्याचे पुढे आले आहे.दरम्यान, जुलै २०२४ पासून निधी मिळत नसल्याचे या संघटनांनी म्हटले आहे. त्यामुळे ५ फेब्रुवारीपासून काम बंद आंदोलनाचा इशारा राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ या दोन संघटनांनी दिला आहे. दरम्यान कंत्राटदारांच्या थकवाकी संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी आम्ही पत्रव्यवहार करत असतो. मात्र त्यावर तुमचे पत्र मिळाले इतकेच उत्तर येते. आजवर आमच्या शिष्टमंडळाला चर्चेसंदर्भात अथवा बैठकी संदर्भात कुठलेही आमंत्रण आलेले नसल्याची माहिती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली आहे.

**CHANGE IN NAME**

I **Rizwana Shahbuddin Basri** W/O.Shahbuddin Ibrahim Basari do hereby declare that my old name **RIZWANA SHAHABODDIN BASRI** has been changed to New Name **RIZWANA SHAHBUDDIN BASRI**, residing at 242/17, Chirag Road, Jodbhavi Peth, Solapur-413 005 Maharashtra State Affidavit No.876 dated 04/02/2025.

**CHANGE IN NAME**

I **Rizwana Shahbuddin Basri** W/O.Shahbuddin Ibrahim Basari do hereby declare that my Daughter old name **KHATIJA SHAHABODDIN BASRI** has been changed to New Name **KHATIJA SHAHABUDDIN BASRI**, residing at 242/17, Chirag Road, Jodbhavi Peth, Solapur- 413 005 Maharashtra State Affidavit No.876 dated 04/02/2025.

**CHANGE IN NAME**

I **Rizwana Shahbuddin Basri** W/O.Shahbuddin Ibrahim Basari do hereby declare that my Daughter old name **UZMA SHAHABODDIN BASRI** has been changed to New Name **UZMA SHAHBUDDIN BASRI,** residing at 242/17, Chirag Road, Jodbhavi Peth, Solapur- 413 005 Maharashtra State Affidavit No.876 dated 04/02/2025.

# भक्तीसागर (65 एकर) येथे दिंडीधारकांसाठी प्लॉटसची नोंदणी सुरु - प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** माघ यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि. 08 फेब्रुवारी 2025 रोजी साजरा होत आहे. माघ यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (65 एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत असून, पालखी, दिंडी धारकांसाठी प्लॉटसची नोंदणी सुरु आहे. दि. 04 फेब्रुवारी पर्यंत 165 दिंड्याची नोंदणी करण्यात आली असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.

माघ यात्रेला येणाऱ्या पालख्या, दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (65 एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. या ठिकाणी एकूण 497 प्लॉट्स असून त्यापैकी वापरायोग्य 450 प्लॉटस आहेत. हे प्लॉटस भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते..भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर (65 एकर) येथे प्लॉटसचे वाटप सुरु असून, या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार आहेत. आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार विजय जाधव (मो.क्र. 8275202155), सुधाकर धाईंजे (मो.क्र.9767248210), तसेच सहाय्यक प्रमोद खंडागळे (मो. क्र. 9657290403) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रांताधिकारी इथापे यांनी केले आहे.

**अकलूज नगरपरिषद,अकलूज**

**ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)**

**फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२**

Gmail-comcakluj21@gmail.com **स्थापना दिनांक ०३-०८-२०२१**

जा.क्रं./२१४०/अनप/२०२४-२५ दिनांक :-०३/०२/२०२५

**जाहीर निविदा सूचना सन २०२४-२५**

**विदयुत विभाग**

अकलूज नगरपरिषद मुख्याधिकारी यांचे मार्फत अकलूज नगरपरिषद हद्दीतील पथदिवे दुरुस्त करणेसाठी विद्युत साहित्य पुरवठा करणे. या कामासाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा सूचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्रके निविदा फॉर्म इत्यादी माहिती अकलूज नगरपरिषदेच्या विद्युत विभागामध्ये उपलब्ध होईल. निविदा सदर करण्याची मुदत दिनांक ०५/०२/२०२५ ते १२/०२/२०२५ राहील.

**सही/- (दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी**
**अकलूज नगरपरिषद,अकलूज**

# सार्वजनिक ठिकाणी थुंकल्याबद्दल ६९ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या व्यक्तीं विरुध्द कारवाई करण्याचा निर्णय महापालिके घेतला असून सोमवारी पहिल्या दिवशी ६९ जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. ठिकाणी थुंकणारे तसेच लघुशंका करणाऱ्या नागरिकांवर अशा प्रकारची कारवाई करणार असल्याचे महापालिकेने यापूर्वी जाहीर केले होते. सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता राखणे हा यामागचा उद्देश आहे. याशिवाय प्लास्टिक बंदीची मोहीम देखील हाती घेण्यात आली आहे. आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशाने आणि शहरातील गड्डा यात्रा परिसर, अतिरिक्त आयुक्त रवी पवार रेल्वे स्टेशन परिसर, भवानी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पेठ, विडी घरकूल, गांधी नगर, नगर, आयुक्त शशिकांत भोसले यांच्या अक्कलकोट रोड, जोडभावी पेठ, नेतृत्वाखाली महापालिकेच्या बुधवार पेठ, मंगळवार बाजार, पथकाने ही कारवाई केली. गुटखा चिप्पा मार्केट,व मावा खाऊन सार्वजनिक सुनील नगर, एमआयडीसी, नीलम नगर, बनशंकरी नगर, आकाशवाणी रोड, आसरा चौक, नई जिंदगी, ओम गर्जना चौक, विनायक नगर, मरिआई चौक, कल्याण नगर, विजापूर नाका, किडवाई चौक, जगदंबा चौक, गुरुनानक चौक या ठिकाणी महापालिकेच्या पथकाने रस्त्यावर थुंकलेल्या ६९ व्यक्तीवर दंडात्मक कारवाई करून १६ हजार ५० रुपये इतकी रक्कम दंड म्हणून वसूल केली.

**Classified - छोटी जाहीरात**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड,** मिरज.

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**हुरडा पार्टी**
**शालेय सहल व हुरडा पार्टी**
आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.
मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)



**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नभ, गगन २) पाहुणे ३) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा ४) लहान बाळाला ही टोचतात ५) भारतात सर्वाधिक साक्षरता असलेले राज्य ६) एअरफोर्स (मराठीत) ७) त्वरेने, पटकन १२) न्यूझिलंडचा एक फलंदाज १४) सेनापती १५) स्त्रियांचा नाकात घालण्याचा दागिना १६) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत १७) खलनायक (इंग्रजीत) २१) देवाला घातलेले साकडे २२) नाहक त्रास करून घेणे २३) २६/११ च्या हल्ल्यातील दहशतवादी २४) महाराष्ट्राचे काँग्रेस आघाडी सरकारचे एक माजी मुख्यमंत्री २६) कृषी विद्यापीठ असलेले कोकणातील ठिकाण ३१) पाच दुणे ३४) लाकूड कापण्याचे साधन ३५) फळ (हिंदीत) ३६) समुद्राच्या पाण्यात असणारा एक प्राणीजीव ३७) एक म्हण- गाव करील ते ** काय करील ३८) चव ओळखणारी जिव्हा ४०) यशाचे गुपित, सूत्र ४१) परिवर्तन ४४) फळातील गोड द्रव ४५) चार आणि तीन मिळून होणारी संख्या ४७) सज्जन, प्रामाणिक

**आडवे शब्द :** १) भारतातील टी-२० क्रिकेट स्पर्धेचे नाव ५) दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे आडनाव ८) शर्टला बटण अडकविण्यासाठी केलेली खाच ९) सत्वयुक्त, कस असलेले १०) तरूण ११) एक जुने हिंदी गीत- ** है सुहाना, वातावरण (हिंदीत) १२) पाण्यात विहरणारा एक पांढऱ्या रंगाचा पक्षी १३) एखाद्या गोष्टीचे लागलेली वाईट सवय १६) महायुध्दाच्या काळातील जर्मनीचा हुकूमशहा १८) अश्व जोडलेले क्षत्रियाचे वाहन १९) किंमती वस्तू २०) चहा (इंग्रजीत) २१) आश्चर्य २३) रंग (इंग्रजीत) २५) वतनाचा मालक २७) दुधावरील मलई २८) आयपीएल टी-२० क्रिकेट सामन्यातील एक युवा भारतीय फलंदाज-** शॉ २९) वस उलट लिहा ३०) देव, ईश्वर (हिंदीत) ३२) सीतापती ३३) त्रास (हिंदीत) ३६) राजाला दिली जाणारी उपाधी ३९) घाई, गडबड ४२) आश्वासन, दिलेला शब्द ४३) विश्वास ४६) मुस्लिम धर्माची शिक्षण देणारी शाळा ४८) नेहमी ४९) उद्या (हिंदीत) ५०) तिखट न टाकलेले डाळीचे कालवण

## सुडोकु - 168

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | | | 3 | | | | 7 | 1 |
| 4 | 3 | 7 | 8 | | | 2 | 5 | |
| | | 5 | | 2 | | | 4 | 9 |
| | 5 | 8 | 4 | | 9 | | 3 | |
| 7 | | | 1 | | | | 9 | 8 |
| 2 | 9 | | | 3 | | | | 4 |
| | 8 | | | 1 | 3 | | | |
| 3 | | 4 | 6 | 8 | 7 | | | |
| 1 | | | 2 | 5 | | | | |

